# वरिष्ठ महाविद्यालय पाटपन्हाळे

# वाणिज्य मंडळ

## वार्षिक अहवाल

## (२०११-१२)

### आधार कार्ड शिबीराचे आयोजन

केंद्र शासनाने राबविलेल्या आधार कार्ड मोहिमेसंदर्भात महाविद्यालयाच्या वाणिज्य मंडळातर्फे मा. जीवन कांबळे, तहसिलदार गुहागर, यांच्या सहकार्याने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी व परिसरातील नागरिकांसाठी दि. २ व ३ ऑगष्ट रोजी महाविद्यालयामध्ये आधार कार्ड शिबीराचे आयोजन करण्यात आले. या दोन दिवसांमध्ये महाविद्यालयातील २२० विद्यार्थी व परिसरातील ११० नागरिकांची आधार कार्ड नोंदणी करण्यात आले.





## वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी ई-मेल सुविधा

वरिष्ठ महाविद्यालय पाटपन्हाळेच्या वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांकरिता वाणिज्य प्रयोग शाळेमार्फत २२ ते २७ ऑगष्ट २०११ या कालावधीमध्ये ई-मेल काढण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. सदर सुविधेचा महाविद्यालयातील २२० विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

## बँक करिअर विषयी सेमिनार

शनिवार दि. २६ नोव्हेंबर २०११ रोजी बँक ऑफ इंडिया, शृंगारतळीचे शाखा व्यवस्थापक श्री. अनिल पै यांचे बँकींग क्षेत्रातील करिअर व अलिकडील काळातील बदल या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. बँकींग क्षेत्रातील असणा-या विविध संधी तसेच अलिकडील काळातील राष्ट्रियकृत बँकांतील मेगा भरती व झालेले विविध बदल या विषयी माहिती दिली.









# वाणिज्य प्रयोग शाळेस संगणक प्रदान

२१ जानेवारी २०१२ रोजी महाविद्यालयाच्या वाणिज्य प्रयोगशाळेसाठी महाविद्यालयातील वाणिज्य शाखेचे प्राध्यापक, वाणिज्य विभागातील माजी विद्यार्थी, आजी विद्यार्थी यांच्या देणगीतून दुसरा संगणक प्रदान करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.जी जाधव यांनी या संगणकाचे उद्घाटन केले.









# खाद्य महोत्सव – वाणिज्य मंडळाचा एक नाविन्यपुर्ण उपक्रम

दि. २५ जानेवारी २०१२ रोज बुधवारला पाटपन्हाळे येथील महाविद्यालयाच्या प्रांगणात वाणिज्य शाखेच्या वाणिज्य मंडळातर्फे भव्य खाद्य महोत्सव साजरा करण्यात आला. खाद्य महोत्सवाच्या माध्यमातून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे पाककृती कौशल्य, विपणन कौशल्य, व्यवस्थापन कौशल्य व आदरातिथ्य कौशल्य वृध्दिंगत व्हावे यासाठी या खाद्य महोत्सवाचे आयोजन केले. या कार्यक्रमात परिसरातील जनतेकरिता विद्यार्थ्यांनी अप्पम, इडली, चकली, पुरणपोळी, गाजर हलवा, चिकन भाकरी (चुलीवरील), कोबी मंचुरियन, कच्ची दाबेली, बासुंदी, चहा, गुलाबजामून, चिकन बिर्याणी, चिकन क्रिप्सी, अंडा कबाब, मच्छी फ्राय, मटर पनीर चपाती इ. वस्तुंची मेजवानी दिली. सदर कार्यक्रमामुळे महाविद्यालय व समाजात अधिकाधिक समन्वय वृध्दींगत होण्यास मदत झाल्याने संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. भालचंद्रजी चव्हाण यांनी प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी व सर्व विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे.


















महाविद्यालय पाटपन्हाळे